| MHYA160006402025 | **संक्षिप्त फौजदारी खटला क्र.४४०/२०२५.**<br>**सरकार विरुध्द अकीम शहा लाल शहा**<br>**निशाणी क्र.११ खाली.** |
|---|---|

## न्यायनिर्णय

(आज दिनांक १८ एप्रिल, २०२६ रोजी पारीत)

१) आरोपी विरुध्द महाराष्ट्र दारुबंदी प्रतिबंध कायदा १९४९ चे कलम ६५(ई) अन्वये प्रतिकथन ठेवलेले आहे.

अभियोग पक्षाची हकीकत थोडक्यात खालील प्रमाणे :-

२) दि. २६.०३.२०२५ रोजी ११.५० ते १३.०० वाजण्याच्या सुमारास राज्य उत्पादन शुल्क, यवतमाळ येथे कार्यरत असलेले दुय्यम निरीक्षक श्री.पी. एस बोढरे आणि त्यांच्यासोबत अमोल बोथले जवान यांच्या पथकांनी दोन पंचासमक्ष मौजे वार्ड क्र १ नायगाव येथील आरोपीच्या राहते घरी छापा घातला असता त्यांना आरोपी हा त्याच्या घरी मिळून आला व पंचासमक्ष त्याच्या घराची झडती घेतली असता घरामध्ये १० लिटर क्षमतेच्या दोन प्लॅस्टीक कॅनमध्ये २० लिटर गावठी हातभट्टीची दारु ज्याची किंमत २१००/- रुपये, २ लिटर क्षमतेच्या एका प्लॅस्टीक बॉटलमध्ये २ लिटर गावठी हातभट्टीची दारु ज्याची किंमत २००/- रुपये, दोन काचेचे ग्लास, एक प्लॅस्टीक मग्गा ज्याची किंमत ७०/-रुपये असा एकुन २३७०/- रुपयाचा मुद्देमाल मिळून आला. म्हणून त्याच्या विरुध्द राज्य उत्पानदन शुल्क यवतमाळ येथे गुन्हा क्र.१६०/२०२५ नोंद करण्यात आला. घटनास्थळी दोन पंचासमक्ष जप्ती पंचनामा तयार करण्यात आला. साक्षीदारांचे बयान नोंदविण्यात आले. जप्त मुद्देमालातून एका सिलबंद बॉटल रासायनिक परिक्षणासाठी पाठविण्यात आली. तपासाअंती आरोपी विरुध्द दोषारोपपत्र न्यायालयात दाखल करण्यात आले.

३) अभिलेखावरील तथ्यांच्या आधारे आरोपी विरुध्द गुन्हयाचा तपशिल निशाणी क्र.११ वर नोंदविला. सदरचा तपशिल आरोपीला त्याच्या बोलीभाषेत वाचून व समजावून

सांगण्यात आला असता त्याने गुन्हा कबुल नसल्याचे सांगितले व संपरिक्षेस सामोरे जाण्याची तयारी दर्शविली. अभियोग पक्षातर्फे आरोपी विरुध्द गुन्हा शाबित करण्यासाठी एका साक्षीदाराला तपासण्यात आले. इतर साक्षीदारांना समन्सची बजावणी होऊन देखील ते हजर झाले नाही. आरोपी विरुध्द कोणतेही आक्षेपार्थ कथन आले नसल्यामुळे त्याचे भारतीय नागरीक संहिता, २०२३ चे कलम ३५१ नुसार त्याचे निवेदन नोंदविण्यात आले नाही.

४) अभिलेखावरील पुरावा व दोन्ही पक्षांचे युक्तीवाद यावरुन खालील मुद्दे माझे अवलोकनार्थ उपस्थित आहे. त्या प्रत्येक मुद्दयांना मी कारणासह खालील प्रमाणे उत्तर दिलेले आहे.

| **अ.क्र.** | **वाद मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १) | अभियोग पक्षाने हे सिध्द केले काय की, दि.२६.०३.२०२५ रोजी ११.५० ते १३.०० वाजण्याच्या सुमारास मौजा वार्ड क्र.१ नायगाव ता. बाभुळगाव, जि. यवतमाळ येथील आरोपीच्या राहते घरामध्ये आरोपीच्या ताब्यातून १० लिटर क्षमतेच्या दोन प्लॅस्टीक कॅनमध्ये २० लिटर गावठी हातभट्टीची दारु ज्याची किंमत २१००/– रुपये, २ लिटर क्षमतेच्या एका प्लॅस्टीक बॉटलमध्ये २ लिटर गावठी हातभट्टीची दारु ज्याची किंमत २००/– रुपये, दोन काचेचे ग्लास, एक प्लॅस्टीक मग्गा ज्याची किंमत ७०/–रुपये असा एकुन २३७०/– रुपयाचा विनापरवाना अवैधरित्या मिळून आला. त्यामुळे आरोपीने महाराष्ट्र दारुबंदी कायदा कलम ६५(ई) प्रमाणे दंडनीय अपराध केला ? | ..... नाही. |
| २) | काय आदेश ? | ...अंतिम आदेशाप्रमाणे. |

## :: कारणमिमांसा ::

५) अभियोग पक्षातर्फे आरोपी विरुध्द खटला शाबित करण्यासाठी अभियोग पक्षाने पंच साक्षीदार क्र.१ विजय रामकृष्णाजी चामलाटे याची साक्ष नोंदविण्यात आली. आरोपीतर्फे

कोणताही साक्षीदार तपासण्यात आला नाही. विद्वान सहाय्यक अभियोक्ता व आरोपीचे विद्ववान वकिलांनी प्रकरणात युक्तीवाद केला.

**<u>मुद्दा क्र.१ करीता</u>**

६) पंच साक्षीदार क्र.१ विजय रामकृष्णाजी चामलाटे हा सदर खटल्यात जप्ती पंचनाम्यावरील पंच साक्षीदार आहे. त्याने त्याच्या साक्षीत सांगितले की, दि. २६.०३.२०२५ रोजी राज्य उत्पादन शुल्क यवतमाळ यांनी पंच म्हणून मौजा वार्ड क्र. १ नायगाव येथील आरोपीच्या राहते घरी बोलविले नव्हते. परंतू त्याला जप्ती पंचनामा दाखविला असता त्याने त्यावरील त्याच्या सहया नाकारलेला आहे. सदरहू साक्षीदार अभियोग पक्षातर्फे साक्ष देत नसल्यामुळे सरकारी वकिलांनी त्याची उलट तपासणीची परवानगी मागितली. परंतु सदर साक्षीदाराच्या उलट तपासात देखील अभियोग पक्षास सहाय्य होईल असे कोणतेही तथ्य अथवा कोणताही पुरावा अभिलेखावर आणता आले नाही.

७) उपरोक्त साक्षीदाराच्या पुराव्याचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, साक्षीदार क्र.१ विजय रामकृष्णाजी चामलाटे याच्या साक्षीतून जप्ती पंचनामा सिध्द झालेला नाही. तसेच अभियोग पक्षाने तपासी अधिकारी व इतर स्वतंत्र प्रत्यक्षदर्शी साक्षीदारांची साक्ष अभिलेखावर नोंदवू शकलेला नाही.

८) अभियोग पक्षाने लेखी रिपोर्ट व प्रथम खबर अहवालातील मजकुर न्यायालयाच्या पुढे सिध्द केलेला नाही. प्रस्तुत प्रकरणामध्ये अभियोग पक्षाने तपासीक अधिकारी व स्वतंत्र साक्षीदारांना वारंवार समन्स काढून देखील त्यांना हजर करुन त्यांची साक्ष नोंदविण्यास अपयशी झालेले आहे. अभियोग पक्षाला हे सिध्द करणे गरजेचे होते की, आरोपीच्या ताब्यातून २२ लिटर गावठी हातभट्टीच दारु विनापरवाना अवैधरित्या मिळून आला. अभियोग पक्षाने रासायनिक विश्लेषन अहवाल सदर प्रकरणात दाखल केला नाही. त्यामुळे सदरचा मुद्देमाल गावठी हातभट्टीची दारु होती किंवा नाही याबाबत शंका निर्माण होते. अभियोग पक्षास इतर साक्षीदारांना तपासण्यात अपयश आले आहे. त्यामुळे आरोपीने वरील प्रमाणे गावठी हातभट्टीची दारु स्वतःजवळ अनधिकृतरित्या बाळगला, हे सिध्द करु शकले नाही. अभियोग पक्ष आरोपी विरुध्द सदर गुन्हा संशयापलीकडे जाऊन सिध्द करु शकला नाही. त्यामुळे आरोपीला दोषी ठरविणे न्यायाचे दृष्टीने उचित होणार नाही. म्हणून मी मुद्दा क्र.१ चे उत्तर नकारार्थी नोंदवित आहे.

**<u>मुद्दा क्र.२ करीता</u>**

९) अभिलेखावरील पुरावा आरोपीस गुन्हयात दोषी धरण्याइतपत स्पष्ट, सबळ व पुरेसा नाही. त्यामुळे फौजदारी प्रणालीनुसार आरोपी विरुध्द दोषारोप संशयापलीकडे अभियोग पक्षाने शाबित केलेला नाही. त्यामुळे मुद्दा क्र.२ चे उत्तराकरीता खालील आदेश पारित करीत आहे.

**–: <u>आदेश</u> :–**

(१) आरोपी अकीम शहा लाल शहा यास महाराष्ट्र दारुबंदी कायदा कलम ६५(ई) प्रमाणे या गुन्हयातून भारतीय नागरीक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम २७८(१) अन्वये निर्दोष मुक्त करण्यात येत आहे.

(२) आरोपीचे वैयक्तीक बंधपत्र व जामीन कदबे रद्द करण्यात येते.

(३) राज्य उत्पादन शुल्क, यवतमाळ यांना असे आदेशीत करण्यात येते की, जप्त मुद्देमाल २२ लिटर गावठी हातभट्टीची दारु, दोन काचेचे ग्लास व एक प्लॅस्टीक मग्गा हे अपील कालावधी संपल्यानंतर नष्ट करण्यात याव्या.

(४) आरोपीने भारतीय नागरीक संहिता, २०२३ चे कलम ४८१ अन्वये रक्क्म रु.१५,०००/– चे वैयक्तीक बंधपत्र द्यावे.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहीर केला)

DISTRICT COURTS MAHARASHTRA
Digitally signed by HARIDAS SANDIPAN SATPUTE
Date: 2026.04.18 15:15:14 +0530

बाभुळगाव.

दिनांक : १८/०४/२०२६.

(एच.एस.सातपुते)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
बाभुळगाव.